# दरपत्रक मागणी

जाक्र.ताआवे/एनएचएम/दरपत्रक मागणी/४३ /२६-२७
तालुका आरोग्य अधिकारी, कुडाळ.
दिनांक : ६/०५/२०२६

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय कुडाळ अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थीक वर्षामध्ये होणा-या विविध शासकीय कार्यक्रम, प्रशिक्षण, तालुका आढावा सभा इ. करिता जेवण, चहा, नाश्ता व हॉलची व्यवस्था उपलब्ध करुन देणेकरिता खालीलनमुन्यांत बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | वर्णन / प्रमाण | दर रुपये |
|---|---|---|---|
| १ | चहा साधा | ७५ मिली. | |
| २ | चहा स्पेशल | ७५ मिली. | |
| ३ | **अल्पोपहार** शिरा गोड/उपिट/कांदा पोहे /समोसा/ वडा पाव/साबू वडा/साबू खिचडी/ इडली चटणी/इडली सांभार/ पाव भाजी /आंबोळी चटणी मिसळ / मेदू वडा/ दहीवडा | १५० ते २०० ग्रॅम | |
| ४ | शाकाहारी जेवण साधे (मर्यादीत) | ३ चपात्या, दोन मुद भात, प्रत्येकी १ वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर | |
| ५ | शाकाहारी जेवण साधे (अमर्यादीत) | चपात्या, भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर खाईल तेवढे | |
| ६ | शाकाहारी स्पेशल जेवण (मर्यादीत) | ३ चपात्या / ५ पु-या, दोन मुद मसाला भात, प्रत्येकी १ वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई /रस गुल्ले | |
| ७ | शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादीत) | चपात्या / पु-या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई /रस गुल्ले खाईल तेवढे | |
| ८ | चिकन बिरयाणी | पाव किलो | |
| ९ | चिकन जेवण (मर्यादीत) | ३ पुरी, दोन मुद भात, सुके चिकन १ वाटी, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| १० | चिकन जेवण (अमर्यादीत) | पुरी, भात, सुके चिकन, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| ११ | व्हेज पुलाव (पाव किलो) | पाव किलो | |
| १२ | हॉल भाडे (१ दिवस) | किमान ९० व्यक्तींची बसण्याची खुर्चासहीत सुविधा, हॉलमध्ये स्टेजची सुविधा असावी तसेच स्टेजवर किमान ८ खुर्ची तिन मोठी टेबल तसेच बॅक बोर्ड व इतर साहित्य ठेवण्यासाठी जागा असावी. त्याचप्रमाणे हॉलमध्ये फॅन, माईक व्यवस्था असावी. तसेच हॉलची सुविधा तालुका कार्यलयापासून २०० मीटरच्या आसपास करावी लागेल. (हॉलचे १ दिवसाचे (१२ तास) भाडे नमूद करावे) | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसापर्यन्त म्हणजेच दि. १४/०५/२०२६ पर्यन्त दुपारी ३ वाजेपर्यन्त विहीत नमून्यांत परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्ती पुर्ण झालेली दरपत्रके त्याच दिवशी म्हणजेच दि.१४/०५/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता खोलून तुलनात्मक तक्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकाला पुरवठा आदेश देणेत येईल.

तालुका आरोग्य अधिकारी
Taluka Health Officer
तालुका कुडाळ
Taluka Kudal

Scanned with OKEN Scanner

**दरपत्रक अटी व शर्ती**

१) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण / नाष्टयानंतरची त्याठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.

२) आमच्याकडे अन्न तयार करण्यासाठी जागा किंवा पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी उपलब्ध नाहीत.

३) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत.

४) कोणतीही एक किवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे.

५) प्रत्येक कार्यक्रमापुर्वी १ किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार व्यवस्था करावयाची आहे.

६) जेवण/चहा/नाष्टाचे देयक NEFT/ PFMS DBT प्रणालीद्वारे संबधीत मक्तेदाराच्या खातेवर जमा केले जाईल.

७) ठरवून दिलेल्या वेळेत खाद्य पदार्थ दरपत्रकात नमूद वर्णनानुसार व दरानुसार दिणे आवश्यक आहे.

८) पुरवठादाराने दरपत्रक देतेवेळी कोणतीही अट घालावयाची नाही.

९) ज्या पुरवठादाराची निविदा मंजूर केली आहे त्यांनी वरील सर्व अटींचे पालन न केल्यास कोणतीही सूचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल. सदरची दरपत्रके २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. १०,०००००/- पर्यन्तच्या पुरवठा आदेशापर्यन्त बंधनकारक रहातील. तसेच जेवण व चहा नाष्टा यांची अंदाजे वार्षिक ऑडर रु.१०,०००००/- पर्यन्त असेल मार्च २७ पुर्वी सदरची आर्थीक मर्यादा संपल्यास सदरचा दरकरार आपोआप रदद होईल. त्यानंतर सदर मक्ता वाढवून देणेबाबत अथवा नविन दर करार करणेबाबतचा अधिकार खाली सही करणार यांचेकडे असेल.

१०) जेवणाची तसेच चहा, नाष्टा, जेवण यांची एका वेळची ऑडर किमान ३० असेल. ३० नगपेक्षा कमी असलेल्या तसेच रक्कम रु.५०००/- पेक्षा कमी रक्कमेची ऑडर असेल तसेच जेवण/चहा/नाश्त/हॉल ची ऑडर देणे अथवा न देणेचा अधिकार तालुका आरोग्य अधिकारी कुडाळ यांचा राहील.

११) दरपत्रक सादर करणा-या मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था नोंदणी दाखला (उदा.नगरपरिषद/ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाच्या पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

**संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून 8 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

Taluka Health Officer
Taluka Kudal

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

१) www.nrhm.maharashtra.gov.in
२) www.arogya.maharashtra.gov.in
३) तालुका आरोग्य अधिकारी नोटीस बोर्ड

Scanned with OKEN Scanner